|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**


---

जाक्रं.कबचौउमवि/५/३८६/२०२४. दि. २४.१०.२०२४.

**अत्यंत महत्त्वाचे(कालमर्यादा दि. २६.१०.२०२४)**

प्रति,
मा.प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व शिक्षणशास्त्र/शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांना

**विषय:-** Performance Appraisal Report (PAR) करीता Certificate for compliance of NCTE Regulations 2014 and Norms & Standards prescribed by NCTE for the teacher education institutions या प्रमाणपत्राबाबत.

**संदर्भ:-**१.NCTE New Delhi यांचे Public Notice F.No.NCTE-Reg १०१२/१२/२०२४-Reg.Sec-HQ, Dt. ९ September २०२४.
२.मा. अधिष्ठाता मंडळ ठराव क्रं.बी.ओ.डी.ए-०८-२०२४, दि. २३.९.२०२४.
३.विद्यापीठाचे परिपत्रक क्रं.कबचौउमवि/५/३६१/२०२४,दि. १.१०.२०२४.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं. १ अन्वये NCTE New Delhi यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ करीता महाविद्यालयांना दि. १० नोव्हेंबर २०२४ पर्यंत PAR ऑनलाईन प्रणालीमार्फत सादर करणे बंधनकारक केलेले असून Annexure-IV मध्ये संलग्नीत विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे.

याबाबत मा. अधिष्ठाता मंडळाने पारीत केलेल्या संदर्भिय क्रं. २ च्या ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून वरील क्रं. ३ अन्वये परिपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची पडताळणी करतांना काही महाविद्यालयांनी विद्यापीठाने प्रमाणित केलेली शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षाची स्टाफ प्रोफाईल(Staff Profile) ची प्रत जोडलेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. संबंधित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ ची विद्यापीठाने प्रमाणित केलेली स्टाफ प्रोफाईल(Staff Profile) बाबतची कार्यवाही केलेली नसल्यास सदर कार्यवाही करून विद्यापीठाची प्रमाणित केलेली स्टाफ प्रोफाईलची फाईल दि. २६.१०.२०२४ पर्यंत संलग्नता विभागास सादर करावी. स्टाफ प्रोफाईलची प्रमाणित प्रत प्राप्त झाल्यानंतरच PAR प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही संलग्नता विभागाकडून करण्यात येईल. प्रमाणित केलेल्या स्टाफ प्रोफाईलची प्रत सादर करण्याची संपूर्णत: जबाबदारी महाविद्यालयाची आहे कृपया याची नोंद घ्यावी. स्टाफ प्रोफाईल सादर न केल्यास प्रमाणपत्र दिले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व त्यासाठी मुदतवाढ दिली जाणार नाही.

कळावे.

आपला विश्वासू

(ग.नी.पवार)
उपकुलसचिव(संलग्नता विभाग)

**प्रत:-** उपकुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग, कबचौउमवि जळगांव.